# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


**परिपत्रक क्र. २७०/२०२५**

**विषय:** पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया पुढील फेरीकरिता मान्यताप्राप्त संशोधन केंद्र/संशोधक मार्गदशकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करणेबाबत..

**संदर्भ:**
१. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १७९/२०२४ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/२४३६) दिनांक: ०७/०८/२०२४
२. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २६२/२०२४ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/३४५३) दिनांक: २५/१०/२०२४
३. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १९५/२०२५ (संदर्भ क्र. शै. प्रवेश/१८६०) दिनांक: २३/०७/२०२५

पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया पुढील फेरीचे आयोजन करण्याच्या अनुषंगाने या परिपत्रकाव्दारे मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग व मा. प्राचार्य/संचालक सर्व संशोधन केंद्र यांना कळविण्यात येते की, सदर प्रक्रियेसाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथील मान्यताप्राप्त संशोधक मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने रिक्त जागा अद्ययावत करण्यासाठी संशोधन केंद्र व संशोधक मार्गदर्शकांसाठी **सोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार** खालील तीन टप्प्यात आवश्यक ती प्रक्रिया गुरुवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ पर्यंत पूर्ण करावी. सदर प्रक्रिया पूर्ण करताना काही तांत्रिक अडचण आल्यास, प्रशासकीय भवन, पहिला मजला येथील आय. टी. सपोर्ट संपर्क क्र. ०२०-७१५३३६३३ अथवा phdtracking_support@pun.unipune.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा.

**सदर प्रक्रिया खालील तीन टप्प्यात विभागली असून संबंधित संशोधन मार्गदर्शकांनी प्रत्येक टप्पा पूर्ण झाल्याची खात्री करणे आवश्यक आहे.**

प्रक्रिया - १ संशोधन केंद्रांने विषय मान्य करून घेणे.

प्रक्रिया - २ संशोधन मार्गदर्शकांनी रिक्त जागांचा तपशील अद्ययावत करणे व विहीत वेळेत प्रक्रिया ३ पूर्ण झाल्याबाबत खात्री करणे.

प्रक्रिया - ३ प्रक्रिया २ पूर्ण झाल्यानंतर संशोधन केंद्रांनी संशोधन मार्गदर्शकांची Request Apporve करून रिक्त जागांचा तपशील प्रवर्गनिहाय ऑनलाईन पध्दतीने जमा करून संकेतस्थळावर रिक्त जागा घोषित झाल्याबाबतची खात्री करावी.

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

संदर्भ: शै.प्रवेश/ १९१६
दिनांक: 28/07/2025

**प्रत:**

| | |
|---|---|
| १. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे<br>२. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/ संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करावी. |

## पीएच्.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया

**पीएच्.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया पुढील फेरीसाठी मान्यताप्राप्त संशोधन केंद्र/संशोधक मार्गदशकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे पूर्ण करावी.**

**प्रक्रिया -१: संशोधन केंद्राने करावयाची प्रक्रिया:**

१. सर्वप्रथम संशोधन केंद्रानी त्यांच्या BOD Login मधून २०२५-२६ चे संशोधन केंद्र संलग्निकरणाचे पत्र अपलोड करावे. त्यानंतर संशोधन केंद्रांना Pending for Approval असे status दिसेल.

२. विद्यापीठ संबंधित विषयात २०२५-२६ साठी संलग्निकरण असल्याबाबत खात्री करून Approve करेल. **ज्या संशोधन केंद्रांनी यापूर्वीच संबंधित विषयास Approval घेतले आहे, त्यांना पुन:श्च Approval घेण्याची आवश्यकता नाही.**

३. संबंधित विषयास Approval मिळाल्यानंतर त्यांचेकडील त्या विषयातील संशोधक मार्गदर्शक यांना जागा अद्ययावत करण्यासाठी पुढील प्रक्रिया पूर्ण करता येईल.

**प्रक्रिया -२ : संशोधक मार्गदर्शकांनी करावयाची प्रक्रिया:**

१. संशोधक मार्गदर्शकांनी सर्वप्रथम त्यांच्या लॉगीनमध्ये त्यांच्याकडील रिक्त जागा घोषित करण्यासाठी संबंधित संशोधन केंद्र जागा घोषित करण्यासाठी उपलब्ध असल्याबाबतची खात्री करावी. जर नसल्यास....

   a. संबंधित संशोधन केंद्रांकडे त्या विषयाचे संलग्निकरण असल्यास त्यांना प्रक्रिया - १ पूर्ण करण्याबाबत अवगत करावे.
   b. संबंधित संशोधन केंद्रांकडे त्या विषयाचे संलग्निकरण नसल्यास ते संशोधन केंद्र पीएच्.डी. प्रवेश प्रक्रियेच्या पुढील फेरीसाठी पात्र असणार नाही.

२. संशोधक मार्गदर्शकांकडील रिक्त जागा अद्ययावत करण्यासाठी संशोधन केंद्र उपलब्ध असल्यास संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या BOD Login च्या Teacher Login व्दारे Login करावे.

   a. Login झाल्यानंतर वैध शिक्षक मान्यता पत्र (Valid Teacher Approval) व संशोधक मान्यता पत्र (Valid Guideship Letter) अपलोड करावे. यापूर्वी सदर दोन्ही पत्र अपलोड केलेले असल्यास पुन्हा अपलोड करण्याची आवश्यकता नाही.
   b. Vacant Position for Ph.D. Admission या मधून Link Open करावी.
   c. Declare Vacancies या टेबल मधील Edit Tab वर Clik करावे.
   d. मार्गदर्शकांना रिक्त जागांची माहिती भरताना Approval संदर्भातील माहिती Teacher Profile मध्ये अद्ययावत असावी.

३. विद्यापीठ परिपत्रकानुसार नव्याने मान्यता प्राप्त मार्गदर्शक, त्यांच्या पदोन्नतीने पीएच्.डी. साठी विहीत संशोधक विद्यार्थी संख्येत झालेली वाढ व वेळोवेळी त्यांच्याकडील संशोधक विद्यार्थ्यांचे पीएच्.डी. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागा इत्यादी सर्व पात्र मार्गदर्शकांनी आपल्या लॉगीनमधून ऑनलाईन पद्धतीने अद्ययावत कराव्यात.

४. काही मार्गदर्शकाच्या लॉगीनमध्ये पीएच्.डी. पूर्ण झालेले/संशोधन केंद्र बदलेले / प्रवेश रद्द झालेले विद्यार्थी दिसत असतील तर त्यांनी त्यांच्या लॉगीन मधून विद्यापीठाने निर्गमित केलेले Declaration/ पत्र अपलोड करावे जेणेकरून त्यांच्या लॉगीनमधून सदर विद्यार्थ्यांची नोंद रद्द करता येईल.

**प्रक्रिया -3 : संशोधन केंद्राने करावयाची प्रक्रिया:**

प्रक्रिया -१ व २ पूर्ण झाल्यानंतर संशोधन केंद्राच्या BOD लॉगीनमध्ये ज्या संशोधक मार्गदर्शकांनी जागा अद्ययावत केल्याबाबतचा तपशील उपलब्ध होईल, त्याबाबत खालील प्रक्रिया पूर्ण करावी.

१. संशोधक मार्गदर्शकांनी अपलोड केलेले वैध शिक्षक मान्यता पत्र व संशोधन मान्यता पत्र संशोधन केंद्रानी तपासून ते वैध असल्याबाबतची खातरजमा केल्यानंतर Approve करावे. यापैकी सर्व मान्यता उपलब्धेबाबत संबंधित संशोधन केंद्रांनी खात्री करावी.

२. संशोधन केंद्राने ज्या संशोधक मार्गदर्शकांना Approve केले आहे त्यांच्याच अद्ययावत केलेल्या रिक्त जागांची माहिती Confirm करावी.

३. संशोधन केंद्रांनी त्यांच्याकडील सर्व विषयांच्या पीएच्.डी. प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध प्रवर्गनिहाय रिक्त जागांची माहिती भरावी व पूर्ण माहिती भरल्यानंतर संबंधित संशोधन मार्गदर्शक व संशोधन केंद्रास ईमेलद्वारे Confirmation प्राप्त होईल.

४. वरीलप्रमाणे सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्याबरोबर संशोधन केंद्रांचा रिक्त जागांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, **रिक्त जागांचा तपशील घोषित झाल्याबाबतची खात्री संबंधित संशोधन मार्गदर्शक व संशोधन केंद्रांनी खालील लिंकवर करून घ्यावी.**

https://bcud.unipune.ac.in/phd_entrance/Applicant/SearchGuideVacancies.aspx

**सर्वसाधारण सूचना:**

१. विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्देशाप्रमाणे संशोधक मार्गदर्शकाचे शिक्षक मान्यतेचे स्वरूप कायमस्वरूपी /नियमित असणे आवश्यक आहे. यामध्ये काही बदल झाला असल्यास तो तात्काळ विद्यापीठास कळविणे बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

२. संशोधन मार्गदर्शक अध्यापक ज्या महाविद्यालयात कार्यरत आहे व त्या महाविद्यालयात संबंधित विषयाचे विद्यापीठ मान्यता प्राप्त संशोधन केंद्र असेल तर अशा अध्यापकांना त्यांच्याच महाविद्यालयात संशोधन मार्गदर्शक होता येईल. अध्यापक कार्यरत महाविद्यालयात संबंधित विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू असेल परंतु संशोधन केंद्र नसेल तर अशा अध्यापकांना परिपत्रक क्र. ६३/२०१९ दि. २७ मार्च, २०१९ मधील नमूद तरतूदीनुसार केवळ एकाच संशोधन केंद्रासोबत संलग्नित राहता येईल व त्यांना केवळ संशोधन सह-मार्गदर्शक (Co-Supervisor) होता येईल, याची नोंद घ्यावी.

४. विद्यापीठाचे संशोधन केंद्र मान्यता पत्र शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे असल्याशिवाय प्रवेश प्रक्रिया करू नये.

५. सर्व विद्यापीठ विभाग/ सर्व संलग्नित संशोधन केंद्रांनी प्रवर्गनिहाय एकूण आरक्षणाच्या टक्केवारीबाबत शासन निर्णयातील तरतुदी व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील तरतुदीनुसार रिक्त जागा घोषित करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

६. विद्यापीठ विभागांनी प्रक्रिया - १ वगळून वरील सर्व सूचनेनुसार जागा अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही करावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क:
Email: phdtracking_support@pun.unipune.ac.in
Phone: 020-71533633

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

D:\PET 2024\Circulars docx